गुजरातचा खेळाडू बटलर बाद फेरीतून बाहेर

अहमदाबाद । वृत्तसंस्था

आयपीएल २०२५ क्रिकेट स्पर्धा आता अंतिम टप्प्यात येऊन ठेपली आहे. स्पर्धेमध्ये ५७ सामने पूर्ण झाले असून, भारत-पाकिस्तानमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे ही स्पर्धा एका आठवड्यासाठी स्थगित करण्यात आली आहे.

येत्या शनिवार (दि.१७)पासून स्पर्धेला पुन्हा एकदा नव्याने सुरुवात होणार आहे. गुजरात टायटन्स संघाने यंदाच्या हंगामात चमकदार कामगिरी बजावली आहे. आयपीएल २०२५ गुणतालिकेत गुजरात टायटन्स पहिल्या स्थानावर आहे. बाद फेरीत आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी गुजरात टायटन्सला अजून एक विजय संपादन करणे आवश्यक आहे. गुजरात टायटन्स संघाला बाद फेरीपर्यंत पोहोचवण्यात शुभमन गिल, जॉस बटलर आणि साई सुदर्शनने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मात्र बाद फेरीच्या निर्णायक टप्प्यापूर्वी इंग्लंड क्रिकेट संघाचा यष्टीरक्षक फलंदाज जॉस बटलर मायदेशी परतणार आहे. २९ मेपासून वेस्ट इंडिज विरुद्ध खेळवण्यात येणाऱ्या द्विपक्षीय मालिकेत तो इंग्लंड संघामध्ये सहभागी होणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीलंका क्रिकेट संघाचा स्फोटक सलामीवीर फलंदाज कुशल मेंडिस बाद फेरीत गुजरात टायटन्सकडून खेळण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे आयपीएल २०२५ मध्ये गुजरात टायटन्सकडून खेळणारा तो श्रीलंकेचा दुसरा खेळाडू ठरला आहे. न्यूझीलंड संघाचा अष्टपैलू ग्लेन फिलिप्स दुखापतीमुळे बाहेर झाल्यामुळे दसून शनाकाचा संघात समावेश करण्यात आला होता.

बंगळुरूचा स्टार गोलंदाज हेझलवूड लवकरच परतणार

बंगळुरू । वृत्तसंस्था

भारत-पाकिस्तानातील वाढत्या संघर्षामुळे स्पर्धा स्थगित करण्यात आल्यानंतर सर्व परदेशी खेळाडू मायदेशी परतले. भारतातील परिस्थिती हळूहळू पूर्वपदावर येत असल्याने भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल क्रिकेट स्पर्धेचे सुधारीत वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यामुळे परदेशी खेळाडू परतू लागले आहेत.

स्पर्धेचा पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स संघांमध्ये बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवण्यात येणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बंगळुरू संघाचा घातक गोलंदाज जॉश हेझलवूड भारतात लवकरच परतणार असल्याने बंगळुरू संघाला मोठा दिलासा मिळाला आहे. सुरुवातीला जॉश हेझलवूडच्या सहभागावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. बाद फेरीच्या जवळ असलेल्या बंगळुरू संघाने रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली उल्लेखनीय कामगिरी केली आहे. बंगळुरू संघाने आयपीएल २०२५ मध्ये ११ सामने खेळले असून, आठ विजय आणि तीन पराभवांसह १६ गुणांची कमाई करत दुसरे स्थान निश्चित केले आहे. तसेच बंगळुरू संघाचा जलदगती गोलंदाज जॉश हेझलवूडने बंगळुरू संघाकडून १० सामने खेळले असून, १८ गडी बाद केले आहेत.

'एफडीए'च्या खबऱ्यांकडून लूट

सुपारीचे ट्रक पकडून दिल्यावर परस्पर बनावट कारवाई

- मालकाकडे सेटलमेंटचे प्रयत्न
- तीन तरुणांना अटक

नाशिक । प्रतिनिधी

एफडीए अर्थात अन्न व औषध प्रशासनास 'टीप' देण्याचे काम करणाऱ्या तिघांनी विभागाला 'सुपारी'चे दोन ट्रक पकडून दिल्यावर या तिघांनी अन्न व औषध निरीक्षक बनून परस्पर दुसऱ्या दिवशी पुन्हा दोन ट्रक पकडून एफडीएत आणून या ट्रकचालकांची जबरी लूट करणाऱ्या तिघांचा कारनामा उघड झाला आहे. गुन्हे शाखा युनिट एकने प्रकरणाची माहिती मिळताच संशयितांचा शोध घेऊन तिघा बेरोजगार 'टिप्पर' तरुणांना अटक केली आहे.

चारुदत्त त्र्यंबक भिंगारकर (३७, रा. सुप्रीम, मुंदडा हॉस्पिटलशेजारी, विजय-ममता थिएटर मागे, आदित्यनगर, नाशिक), मयूर अशोक दिवटे (३२, रा. देशपांडे गल्ली, बुधवार पेठ, भद्रकाली, नाशिक) व नवीन अशोक सोनवणे (३५, रा. न्यू मैत्रिय सोसायटी, कमोदनगर, इंदिरानगर, नाशिक) अशी संशयितांची नावे आहेत. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली स्विफ्ट कार, जबरी लूट केलेले ट्रकच्या किल्ल्या, चालकांकडील रक्कम असा चार लाख ९१ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला. नाशिक एफडीएने दोन दिवसांपूर्वीच सुपारीच्या अवैध वाहतुकीसह अन्य कारणांतून २५ ते ३० टन सुपारीची वाहतूक करणारे दोन ट्रक जप्त केले आहेत. हे ट्रक वरील तिघा संशयितांच्या टीपमार्फत कारवाई करून जप्त करण्यात आले असून त्याबाबत तपास व चौकशी सुरू आहे. असे असतानाच या कारवाईच्या एक दिवसानंतर संशयित चारुदत्त, मयूर व नवीन यांनी एक प्लॅन आखला. त्यानुसार त्यांनी मिळालेल्या सोर्सच्या माध्यमातून येवला-कोपरगाव रोडवरील टोलनाका येथे रविवारी (दि. ११) पहाटे पाच वाजता सुपारी वाहतुकीचे दोन ट्रक अडवले. 'आम्ही अन्न व औषध प्रशासनाचे निरीक्षक व अधिकारी आहोत, तुम्ही ट्रकमध्ये अवैधरीत्या माल भरून वाहतूक करत असल्याने कारवाई करत आहे' असे दोन्ही ट्रकचालकांना सांगितले. त्यानंतर कारवाई खरी भासवण्यासाठी तिघा संशयितांनी हे ट्रक त्र्यंबकरोडवरील उद्योग भवनात असलेल्या अन्न औषध प्रशासनाच्या कार्यालय आवारात आणून जप्त केल्याचे दाखवले. येथे ट्रकचालकांना कारवाईची भीती दाखवून ट्रकच्या किल्ल्या, चालकांचे मोबाईल, पैसे व कागदपत्रे, मालाच्या पावत्या ताब्यात घेतल्या. यानंतर कारवाईच्या धाकाने भेदरलेल्या चालकांनी वाच्यता केली नाही. मात्र गेल्या दोन दिवसांपासून ते ट्रकमध्येच स्वयंपाक करून गुजराण करत असल्याचे उघड झाले. तसेच त्यांनी घडलेल्या प्रकाराची माहिती मालकाला दिली. त्यानंतर खऱ्या अर्थाने ही बनावट कारवाई 'फेक एफडीए' अधिकाऱ्यांनी केल्याचे समोर आले. यानंतर दिवटे, भिंगारकर व सोनवणेचे पितळ उघडे पडले. याबाबत ट्रकचालकाच्या फिर्यादीनुसार, सातपूर पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

असे अडकले जाळ्यात

गुन्हे शाखा युनिट एकचे वरिष्ठ निरीक्षक मधुकर कड यांच्या सूचनेवरून पथकाने तपास सुरू केला. तेव्हा अंमलदार नितीन जगताप व राम बर्डे यांना संशयित स्विफ्ट कारमधून अंबड लिंकरोडने पॉवर हाऊसकडे जाणार असल्याचे कळाले. यानंतर सहाय्यक निरीक्षक हिरामण भोये, उपनिरीक्षक सुदाम सांगळे, हवालदार रमेश कोळी, महेश साळुंके, मुक्तार शेख, राहुल पालखेडे, जगेश्वर बोरसे यांनी एमएच १५ सीडी ७७७४ कारसह दिवटे व भिंगारकरला ताब्यात घेतले, तर तिसरा संशयित नवीन हा टिळकवाडी सिग्नल येथे आला असता मुक्तार शेख व पथकाने त्याला ताब्यात घेतले. संशयितांना आता सातपूर पोलिसांनी अटक केली असून सखोल तपास सुरू आहे.

सुपारी अधिकृतच

ट्रकमधील सुपारी अधिकृत व तशी कागदपत्रे असताना कारवाई का झाली, यासाठी ट्रकमालक नाशिकमध्ये आले. त्यांनी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांची भेट घेतली. तेव्हा कर्णिक यांनी युनिट एकला सखोल तपासाचे आदेश दिले. त्यानंतर युनिट एकने वेळ न दवडता मुख्य सूत्रधारांना चतुर्भूज केले. दरम्यान, या दोन ट्रकवर कारवाई केलीच नसल्याचे एफडीएने स्पष्ट केले असून ट्रकमालकाने अन्न औषध सहआयुक्तांची भेट घेतल्यावर त्रिकुटाचा खेळ उघड झाला. मात्र, ट्रकचालकांना मोठा मनस्ताप: सहन करावा लागला आहे. संशयित दिवटे हा ट्रॅव्हेलर चालक असून इतर दोघे ब्रोकर असल्याचे कळते. ब्रोकरींग करतानाच त्यांनी एफडीएसाठी खबरी म्हणून टीप देण्यासाठी काही महिन्यांपासून काम सुरू केल्याचे समजते.

'तोडी करायची होती'

संशयित हे एफडीएचे खबरी असल्याने त्यांना या स्वरुपाच्या कारवायांचा काहीसा अनुभव आहे. त्यामुळे त्यांनी परस्पर दोन ट्रक पकडले. एफडीए अधिकारी असल्याचे भासवून ट्रकमालकाकडे ट्रक सोडून देण्यासाठी तडजोडीची भाषा केली. मात्र माल अधिकृत असल्याने मालकाने नकार देत नाशिक गाठले. दरम्यान, मालकाने गांभीर्य ओळखून पावले उचचलल्याने तोडी करण्याची तिघांची हौस फिस्कटली असून ते गजाआड झाले आहेत.

नाशिकच्या भूमिकाला सुवर्ण; श्रेयसची रौप्यपदकाची कमाई

खेलो इंडिया यूथ गेम्स

नाशिक । बिहार येथे आयोजित खेलो इंडिया यूथ गेम्स २०२५ मध्ये नाशिकच्या ॲथलेटिक्स सेंटरची खेळाडू भूमिका नेहते ही सर्वात वेगवान खेळाडू ठरली आहे. तर श्रेयस जाधव याने ४ बाय ४०० मीटर रिले या प्रकारात महाराष्ट्राच्या संघाला रौप्यपदक प्राप्त करून दिले.

भूमिका २०० मीटर धावण्याची शर्यत अवघ्या २४.५१ सेकंदात पूर्ण करून सर्वात वेगवान धावपटू ठरली आहे. तिने हरियाणाच्या खेळाडूला मागे टाकत महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिले. याचबरोबर ४ बाय १०० मीटर रिले प्रकारात भूमिकाने सुंदर कामगिरी करत महाराष्ट्राला आणखी एक सुवर्णपदक प्राप्त करून दिले आणि दुहेरी सुवर्ण कामगिरी करत नाशिकच्या क्रीडा क्षेत्राची मान भारतभर उंचावली आहे. तसेच नाशिकचा खेळाडू श्रेयस जाधव याने ४ बाय ४०० मीटर रिले या प्रकारात महाराष्ट्राच्या

संघाला रौप्यपदक प्राप्त करून दिले. नाशिकच्या या दोन खेळाडूंनी महाराष्ट्राला दोन सुवर्ण आणि एक रौप्यपदक प्राप्त करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. हे दोन्हीही खेळाडू मागील चार वर्षांपासून नियमित राष्ट्रीय एन.आय.एस. कोच सिद्धार्थ वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकच्या विभागीय क्रीडा संकुल येथे सराव करत आहेत.

बारावी गुणपत्रिकांचे आज विद्यार्थ्यांना वाटप

पुणे । प्रतिनिधी

राज्य मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल पाच मे रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला होता. आता बारावीच्या विद्यार्थ्यांना गुणपत्रिका, स्थलांतर प्रमाणपत्र, तपशीलवार गुण दर्शवणारे शालेय अभिलेख यांचे वाटप संबंधित विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना १६ मे रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. त्यानंतर उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याच दिवशी दुपारी तीन वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्याचे निर्देश राज्य मंडळाने परिपत्रकाद्वारे दिले आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) जून-जुलैमध्ये घेण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह २४ मेपर्यंत तर विलंब शुल्कासह २९ मेपर्यंत अर्ज भरता येणार आहे.

तसेच बारावीच्या विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडून शुक्रवारी (दि. १६) दुपारी तीन वाजता गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येणार असल्याचे राज्य मंडळाचे सचिव देवीदास कुलाळ यांनी सांगितले.

विजेबाबतच्या तक्रारींचे निराकरण करा

पावसाळा पूर्वतयारी आढावा बैठकीत आ. फरांदेंचे आदेश

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहराला मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाचा तडाखा बसत आहे. वादळी पावसामुळे अचानक वीजपुरवठा खंडित होत आहे. अशावेळी नागरिक वीज मंडळाच्या अधिकारी तसेच सेवकांना फोन करतात मात्र ते फोन उचलत नाही, हे योग्य नाही. नागरिकांचे फोन उचलून त्यांना योग्य माहिती द्यावी व लवकरात लवकर तक्रारीचे निराकरण करावे, अशी तंबी भाजपच्या मध्य नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांनी काल झालेल्या आढावा बैठकीत दिली.

नाशिक शहरातील मान्सून पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आ. देवयानी फरांदे यांनी गुरुवारी (दि.१५) विविध शासकीय विभागांची बैठक आयोजित केली होती. आ. फरांदे यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत नाशिक महानगरपालिका कार्यकारी अभियंता रवींद्र बागुल, संदेश शिंदे, कार्यकारी अभियंता गणेश मैंद, उद्यान

अधीक्षक विवेक भदाणे तसेच महावितरण कंपनी कार्यकारी अभियंता वाडे, कार्यकारी अभियंता जाधव, उपअभियंता बोरसे, पवार आदी अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. फरांदे यांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. पाऊस येताच महावितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडित होतो. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर अधिकाऱ्यांसह कर्मचारी ग्राहकांचे फोन उचलत नाहीत, याबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच भविष्यात अशा तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.

मान्सून पूर्वतयारी करताना महावितरण कंपनीने तसेच महापालिकेने झाडांची छाटणी करणे गरजेचे आहे. ही छाटणी करताना पालपाचोळा गटारीत जाणार नाही याची दक्षता घ्यावी, मनपाने गटारी व पावसाळी गटारी स्वच्छ करून घ्याव्यात. त्यामुळे पावसाचे पाणी लवकर वाहून जाण्यास मदत होईल. अनेक ठिकाणी नागरिकांनी गतिरोधकाची मागणी केलेली आहे. त्या ठिकाणी गतिरोधक लवकरात लवकर लावून देण्यात यावे, असे आदेश त्यांनी दिले.

गुलमोहोर : मृत्यूचा सापळा

दरवर्षी एप्रिल-मेमध्ये घटना; शहर-जिल्ह्यात चार वर्षांत नऊ जणांचा बळी

नाशिक । भारत पगारे

मनाला मोहणारी गुलमोहोराची झाडे पादचारी व वाहनधारकांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहेत. सन १९९२ ते १९९७ या कालावधीत शहरात लावण्यात आलेल्या ९३ हजार गुलमोहोराच्या झाडांची वाढ पूर्ण झाली असून अनेक झाडे आजमितीस आतून पोकळ झाली आहेत, असे पाहणीतून आढळले आहे. मात्र इतर झाडांपेक्षा गुलमोहोर उन्मळून व कोसळून पडण्याचे प्रमाण अधिक आहे. अशा विविध घटनांत नाशिकमध्ये गेल्या चार वर्षांत नऊ नागरिकांचा हकनाक बळी गेला आहे.

सध्या शहरात अवकाळी पावसाने दाणादाण केली आहे. मान्सून सुरू होण्यास दीड महिना बाकी असताना शहरात मे महिन्यात अवकाळीने सर्वदूर नुकसान केले आहे. वादळ वारा व विजांच्या कडकडाटासह सुरू असलेल्या या अवकाळीने नाशिक शहर व जिल्ह्यातील पावासाळापूर्व कामांची पोलखोल केली आहे. त्यात नाशिक शहरात विविध ठिकाणची ५२०हून अधिक जुनी, जीर्ण व पोकळ झालेली छोटी-मोठी झाडे कोसळली व उन्मळून पडली आहेत. दरम्यान, यातील काही झाडे अनेक नागरिक, वाहनधारक व पादचाऱ्यांच्या अंगावर कोसळल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे. अजस्त्र, पोकळ व वाळवीने पोखरलेली काही झाडे कोसळून नागरिकांना क्षणार्धात दाबून मृत्यूच्या कवेत घेत असल्याने रस्त्यालगतच्या झाडांचा धोका निर्माण झाला आहे. आता यावर आवश्यक त्या उपाययोजना झाल्याच तर 'झाड हे मृत्यूचे सापळे' असे समीकरण बदलण्यास मदत होऊ शकणार आहे. दरम्यान, गुलमोहोर वृक्षाचा फारसा उपयोग नाही. या वृक्षाचा घरटी बांधण्यासाठी कुठलाही पक्षी उपयोग करत नाही (काही नगण्य अपवाद). या झाडावर मधमाशा, फुलपाखरेही येत नाही किंवा कुठल्याही स्थानिक कीटकाला याचा उपयोग नाही. ही झाडे पावसाळ्यात लवकर उन्मळून पडतात. या झाडाची मुळे जमिनीलगत पसरतात. रस्त्याच्या कडेला लावल्यास मुळांना पसरायला जागा मिळत नाही. गेल्या काही वर्षांत केलेल्या पाहणीत असे आढळून आले आहे की, पावसात उन्मळणाऱ्या वृक्षांत गुलमोहोराची संख्या सर्वाधिक आहे.

नुकत्याच झालेल्या वादळी पावसात कोसळलेले गुलमोहोराचे झाड

यांचा झालाय मृत्यू

- **अतुल गांगुर्डे** (वय ३५, रा. एकलहरा कॉलनी, नाशिक)
- **अलका अनिल सोनवणे** (वय ५५, रा. शिवाजीनगर, सातपूर)
- **दत्तात्रय गोकुळ बच्छाव** (वय ५१)
- **रामजी देवराम भोये** (वय ४९)
- **नितीन सोमा तायडे** (वय ३२, तिघे रा. पंचवटी, नाशिक)
- **शैला शांतीलाल पाटणी** (५२, गंजमाळ, नाशिक)
- **पोपट सोनवणे** (५२, शिवाजीनगर, सातपूर)
- **गौरव भास्कर रिपोर्टे** (वय २१) **सम्यक नीलेश भोसले** (वय १९, दोघे रा. रमाबाई आंबेडकरनगर, मालधक्का रोड, गुलाबवाडी, देवळाली गाव)

ठळक मुद्दे

- एप्रिल महिन्यात वाढत्या घटना
- आकर्षक व लवकर वाढ होत असल्याने लागवड
- नियमाप्रमाणे गुलमोहोर लावण्यास बंदी
- आजमितीस शहरात २०० पेक्षा झाडांना कीड, वाळवीने पोखरले
- मनपा फांद्या तोडणार, भार कमी करणार

वर्षनिहाय झालेले मृत्यू

जुलै २०२१- ३	एप्रिल २०२२ - १	मे २०२५ - २
जून २०२२- २	एप्रिल-२०२५- १	

नाशकात पाचशे झाडे धोकादायक

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक शहरात सुमारे पाचशे झाडे धोकादायक असल्याची माहिती मिळाली आहे. मनपाच्या उद्यान विभागाकडून त्यांना हटवण्याची कार्यवाही सुरू झाली नसली तरी आतापर्यंत सुमारे तीनशे ठिकाणांहून वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे पडलेल्या फांद्या मनपाच्या उद्यान विभागाने उचलल्या आहेत.

यातील अनेक झाडांची मुळे सडली असून, काही झाडे वाकलेली आहेत. अशा झाडांना तत्काळ हटवण्याची गरज आहे. या धोकादायक झाडांमध्ये प्रामुख्याने निलगिरी, गुलमोहर, रेन ट्री, सिल्व्हर ओक अशा मोठ्या व वयोवृद्ध वृक्षांचा समावेश आहे. हवामान बदल, वादळी वारे व पावसाळा तोंडावर असताना ही झाडे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका ठरू शकतात. मात्र त्यांना काढण्याची किंवा धोका टाळण्यासाठी मनपाकडून अद्याप नियोजन झालेले नाही. दरम्यान, मनपाच्या उद्यान विभागाने मागील १५ दिवसांमध्ये सुमारे तीनशे ठिकाणी धोकादायक फांद्या काढून त्या भागातील रस्ते व परिसर मोकळे केले आहेत. त्यामुळे संभाव्य अपघात टळले असून, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक ती काळजी घेतली जात असल्याचा महापालिकेचा दावा आहे.

देशदूत
हे दैनिक मुद्रक व प्रकाशक **राजेंद्र कृष्णराव सोनवणे** यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. बी ६४, नाईस, सातपूर, नाशिक - ४२२००७ येथे मुद्रित करून देशदूत कार्यालय, काँग्रेस हाऊस, म.गांधी रोड, नाशिक येथे प्रसिद्ध केले.
● संपादक - * **डॉ. वैशाली बालाजीवाले** ✆ : शहर- २५७५७१६, २५७२४००, फॅक्स - २५७०९३८. ● नाशिकरोड कार्यालय - २९४२२०३, ● मालेगाव कार्यालय फोन व फॅक्स - ०२५५४-२९९२०३, ● सिन्नर फोन व फॅक्स -०२५५१ - २९९२०३, ● दिंडोरी फोन व फॅक्स - ०२५५७-२२२८८८, ● निफाड फोन व फॅक्स - ०२५५७-२९९६९६. (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) ● Mail id : newseditnsk@deshdoot.com